मुंबई लक्षदीप ३
मुंबई, शुक्रवार, दि. २६ ऑगस्ट २०१६

# हॅथवे केबल ॲण्ड डाटाकॉम लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** रहेजास, ४था मजला, मेन एव्हेन्यू व व्ही.पी.रोडचा कॉर्नर, सांताक्रुझ (प), मुंबई-४०००५४.
**दूर.:** ९१-२२-२६००१३०६, **फॅक्स:** ९१-२२-२६००१३०७
**सीआयएन:** एल६४२०४एमएच१९५९पीएलसी०११४२१
**वेबसाईट:** www.hathway.com **ई-मेल:** info@hathway.net

## सदस्यांना सूचना

कंपनीच्या सदस्यांना येथे सूचित करण्यात येत आहे की, कंपनी कायदा २०१३ (कायदा) च्या कलम १०८ व कलम ११० सहवाचिता कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) अधिनियम, २०१४ (अमलातील काळाकरिता कोणतीही वैधानिक फेरबदल किंवा पुर्नकायदा समाविष्ट) नुसार खालील ठरावांवर कंपनीने **शुक्रवार १९ ऑगस्ट, २०१६** (निश्चित दिनांक) रोजी सदस्य नोंद पुस्तक/लाभार्थी मालकांचे नोंद पुस्तक मध्ये ज्या सदस्यांची नावे नमूद आहेत त्यांना विद्युत स्वरूपाने (ई-वोटिंग) मतदानासह टपाल मतदानाद्वारे सदस्यांची अनुमती घेण्यासाठी टपाल मतदान पत्रिकासह टपाल मतदान सूचना व स्पष्टीकरण अहवाल पाठविण्यात आलेला आहे.

१. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ च्या नियम २४(५) आणि कंपनी कायदा २०१३ च्या लागू तरतूदींनुसार जीटीपीएल हॅथवे प्रायव्हेट लिमिटेडद्वारे नियोजित इनिशियल पब्लिक ऑफर अंतर्गत जीटीपीएल हॅथवे प्रायव्हेट लिमिटेडचे ९,०००,००० समभाग पर्यंत प्रस्ताव व निवारण करणे बाबत विशेष ठराव.

ई-वोटिंग प्रक्रिया व टपाल मतदान योग्य व पारदर्शकरित्या संचालनाकरिता तपासनीस म्हणून श्री.हिमांशु एस. कामदार, भागीदार मे.राठी ॲण्ड असोसिएट्स, कार्यरत कंपनी सचिव (सदस्यत्व क्र.५१७१) यांची कंपनीच्या संचालक मंडळाने नियुक्ती केली आहे.

टपाल मतदान पत्रिका व स्वपत्ता लिहिलेले मुद्रांक शुल्क भरलेले व्यवसाय प्रतिसाद लिफाफेसह टपाल मतदान सूचना वितरणाची प्रक्रिया कंपनीने **गुरुवार २५ ऑगस्ट, २०१६** रोजी पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. सविस्तर सूचना व ई-वोटिंगबाबत माहिती सदस्यांना पाठविण्यात आलेल्या टपाल मतदान सूचनेत नमूद केलेली आहे.

**शुक्रवार १९ ऑगस्ट, २०१६** (निश्चित दिनांक) रोजी सदस्यांच्या नावे नोंद भरणा केलेल्या शेअर्सच्या मूल्यावर सदस्यांचे मतदान अधिकार निश्चित असतील. जो व्यक्ती नोंद तारखेला सदस्य नसेल त्याने सदर सूचना माहितीकरिता म्हणून घ्यावी. सूचना व स्पष्टीकरण अहवाल तसेच बॅलेट पेपरचे नमुना आणि ई-वोटिंगबाबत सर्व तपशिल कंपनीच्या www.hathway.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ज्या सदस्यांकडे वास्तविक/डिमॅट स्वरूपात भागधारणा आहे त्यांना विद्युत स्वरूपाने किंवा टपाल मतदान पत्रिकेने मतदानाचा पर्याय असेल. सदस्यांना मतदानाचा कोणताही एक पर्याय अर्थात टपाल मतदान पत्रिकेने किंवा विद्युत पध्दतीने मतदानाचा पर्याय स्विकारावा लागेल. जर सदस्याने वास्तविक टपाल मतदान तसेच विद्युत पध्दतीने मतदान केल्यास विद्युत पध्दतीने केलेले मतदान ग्राह्य धरले जाईल आणि टपाल मतदान अवैध ठरवले जाईल.

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की:

१. जर सदस्याने वास्तविक टपाल मतदान पत्रिकेने मतदान केल्यास सदर नमुनापत्र पूर्णपणे भरून व स्वाक्षरी करून तपासनीस यांच्याकडे **शनिवार २४ सप्टेंबर, २०१६ रोजी सायं.५.००वा. पर्यंत** कार्यालयीन वेळ समाप्तीपूर्वी पोहोचतील अशा तऱ्हेने पाठवावेत. सदर तारखेनंतर प्राप्त सर्व टपाल मतदान पत्रिका हे सदस्यांचे प्रतिसाद असले तरीही प्राप्त झालेले नाहीत असे समजण्यात येईल.
२. जर सदस्याने ई-वोटिंगने मतदानाचा पर्याय स्वीकारल्यास त्यांनी त्यांचे मत **शुक्रवार २६ ऑगस्ट, २०१६ रोजी स.१०.०० ते शनिवार २४ सप्टेंबर, २०१६ रोजी सायं.५.००वा. पर्यंत** ऑनलाईन द्यावे. कृपया नोंद असावी की, तदनंतर मतदानाकरिता ई-वोटिंग पध्दत बंद केली जाईल.

ज्या सदस्यांना टपाल मतदान पत्रिका प्राप्त झाली नसेल त्यांनी कंपनीच्या (www.hathway.com) या वेबसाईटवरून डाउनलोड करून घ्यावे किंवा कंपनीचे निबंधक व भाग हस्तांतरण प्रतिनिधी मे. लिंक इनटाईम इंडिया प्रा.लि., सी-१३, पन्नालाल सिल्क मिल्स कंपाउंड, एलबीएस मार्ग, भांडुप (प), मुंबई-४०००७८ येथे वास्तविक सूचना व टपाल मतदान पत्रिका प्राप्त करण्यासाठी लेखी स्वरूपात दुय्यम टपाल मतदान पत्रिकाकरिता अर्ज करावा.

सोमवार २६ सप्टेंबर, २०१६ रोजी सायं.४.००वा. ८०४, कॉर्पोरेट ॲनेक्स, ८वा मजला, विंडसर, सीएसटी कुर्ला रोड, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८ येथे निकाल घोषित केला जाईल आणि कंपनीच्या www.hathway.com वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल.

विद्युत मतदानासह टपाल मतदान संदर्भात तक्रारीचे निवारण करण्यास जबाबदार व्यक्तीचे संपर्क तपशिल खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| नाव | श्रीमती एल्वीन सुबालता |
| पत्ता | मे. लिंक इनटाईम इंडिया प्रा.लि., (निबंधक व हस्तांतरण प्रतिनिधी) सी-१३, पन्नालाल सिल्क मिल्स कंपाउंड, एलबीएस मार्ग, भांडुप (प), मुंबई-४०००७८ |
| दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी | ०२२-२५९६३८३८/ ९६९९०८७७९८ |

हॅथवे केबल ॲण्ड डाटाकॉम लिमिटेडकरिता
सही/-
**अजय सिंग**
प्रमुख-कायदा, कंपनी सचिव व
मुख्य सक्षम अधिकारी
(एफसीएस-५१८९)

ठिकाण: मुंबई
दिनांक: २५ ऑगस्ट, २०१६